## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५, कलम - ३ अन्वये प्रसिध्द करावयाची माहिती

जा.क्र./प्रशा/१४३७/१८. दि.२५/७/२०१८

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशिल | नियत कालावधी | पद निर्देशित अधिकारी | प्रथम अपील अधिकारी | व्दितीय अपील अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | वारस हस्तांतरण विषयक सेवा | ६०दिवस | संबंधित सक्षम प्राधिकारी | सचिव | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | अ) परिशिष्ट-२ मध्ये पात्र झोपडीधारका मयत झाल्यास सदनिकाचे वाटप करण्यापुर्वी विकसकाकडून तसेच पात्र झोपडीधारकाकडून मयत पात्र झोपडीधारकांची यादी प्राप्त करुन घेऊन योजना स्थळी प्रसिध्द केल्यानंतर वारस नोंदणीबाबत अर्ज प्राप्त करणेबाबतची मुदत | (१५ दिवस) | | | |
| | ब) वारस नोंदीबाबत सुनावणी घेणे. आलेल्या सुनावणी मध्ये सदनिकेचा ताबा देणेबाबत वारसांमध्ये एक मत न झाल्यास सर्व कायदेशीर वारसांकडून सदनिकेचा ताबा निश्चित करण्याबाबत व पुन्हा हरकत न घेण्याबाबत प्रतिज्ञापत्र/बंधपत्र तयार करुन घेणे | (२०दिवस) | | | |
| | क) सुनवाणीमध्ये वारसांबाबत निर्णय झाल्यानंतर जाहिर प्रकटन देवून विहित मुदतीत कोणताही आक्षेप/हरकत न आल्यास वारसाचे नाव निश्चित करणे | (२५ दिवस) | | | |
| | ड) विहित मुदतीत आक्षेप वा हरकत प्राप्त झाल्यास त्याबाबत या कार्यालयामार्फत निर्णय घेतला जाणार नाही. सदर प्रकरणी संबंधितांनी सक्षम न्यायालयातून त्यांचा वारसा हक्क शाबित करुन घेणेबाबत कळविण्यात येईल. | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर १० वर्षांनी सदनिका हस्तांतरण विषयक सेवा<br>अ) हस्तांतरण अर्ज प्राप्त झाल्यानंतर सुनावणी घेणे.<br>ब) सुनावणी अंती हस्तांतरणास परवानगी देणे. | (४० दिवस) | संबंधित सक्षम प्राधिकारी | सचिव | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंदणी विषयक सेवा<br>अ) सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंदणी करणे(झोपुप्रा, पुणे यांचे कार्यक्षेत्रातील संस्थांबाबत)<br>ब) सहकारी गृहनिर्माण संस्थांची उपविधी दुरुस्ती करणे(झोपुप्रा, पुणे यांचे कार्यक्षेत्रातील संस्थांबाबत) | २ महिने<br>२ महिने | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, झोपुप्रा, पुणे | मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे | शासन |

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे